# वसई-विरार शहर महानगरपालिका
## अनधिकृत बांधकाम विभाग

दि.२९/०८/२०२२

### प्रेसनोट

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'बी' कार्यक्षेत्रातील नालेश्वर नगर, मोरेगाव, नालासोपारा येथे उप-आयुक्त श्री.अजित मुठे यांचे निर्देशानुसार एका दोन मजली इमारतीवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'बी' येथे एका अनधिकृत दोन मजली इमारतीचे बांधकाम सुरु असल्याची माहिती मिळाल्यावर महानगरपालिकेचे नवनियुक्त उप-आयुक्त श्री.अजित मुठे यांनी सदर ठिकाणी भेट दिली. या संदर्भात मा.आयुक्त व मा.अतिरिक्त आयुक्त यांच्याशी चर्चा करून त्यांचे मार्गदर्शनाखाली व दिलेल्या निर्देशानुसार उप-आयुक्त श्री.अजित मुठे यांनी प्रभाग समिती 'बी' चे प्र.सहा.आयुक्त श्री.दयानंद मानकर यांना तात्काळ तोडक कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार प्र.सहा.आयुक्त यांनी कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने व पोकलेनच्या सहाय्याने सदर ३००० चौ.फुट इमारतीवर पूर्णतः निष्कासनाची कारवाई केली. यावेळी अतिक्रमण विभाग प्रमुख हरिश्चंद्र जाधव, अतिक्रमण विभागाचे अभियंता कुणाल घरत, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान व अतिक्रमण विभागाचा कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

मा.आयुक्त व मा.अतिरिक्त आयुक्त यांचे निर्देशानुसार लवकरच वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे निष्कासीत करण्याची मोहीम मोठ्या प्रमाणात हाती घेणार असल्याचे उप-आयुक्त श्री.अजित मुठे यांनी सांगितले.

**अनधिकृत बांधकाम विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**